# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २३/१२/२०२३

दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पो स्टै फ्रेजरपुरा अप क्र १०९१/२०२३ कलम ३२४ २९४ ३४ भादवी | बेनोडा जवळील शाळेजवळ अमरावती | दि. २६/१२/२०२३रोजी रात्री १०.०० वा दरम्यान<br><br>दाखल ता. वेळ दि. २७/१२/२०२३चे ०२.०३ वा. | हेमंत श्रीकृष्ण गवळी वय २१ वर्ष व्यवसाय - मजुरी रा. तांत्रीक कॉलनी बेनोडा अमरावती | ओम गावंडे व सुमित मडावी दोन्ही रा. अमरावती | हकीकत अशा प्रकरे आहे की, यातील फिर्यादी हा इसार पेट्रोलपंप येथे काम करतो माझे मोहल्यातील ओम गावंडे व सुमित मडावी दोन्ही रा. अमरावती राहतात मी त्यांना मागील दोन वर्षापासुन ओळखतो दि.२६/१२/२०२३रोजी रात्री १०.०० वा दरम्यामन मी अँक्टीव्हा गाडीने नॅशनल हायवे दस्तुर नगर कडुन घरी येत असतांना मला ओम गावंडे याचा मो क्र. वरून फोन आला व त्याने मला म्हटले की तु घरी पोहच मग मी सांगतो मी त्याला म्हटले की तु एवढ्या आवाजात का बोलत आहे यावरून त्याने मला अश्लिल भाषेत शिवीगाळ करून धमकी दिली. व त्याने मला बेनोडा जवळील शाळेजवळ बोलाविले ,तेव्हा माझे सोबत गोलु स्वर्गे व दिप खांडेकर हे त्यांच्या गाडीवर माझे सोबत आले तेव्हा बेनोडा जवळील शाळेजवळच ओम गावंडे व सुमित मडावी हे दोघेही तेथे उभे होते. ओम गावंडे याने मला त्याच्या हातातील कड्याने मारहान करण्यास सुरू केले ,तेव्हा माझे मित्र त्यांना समजाविण्यास गेले असता ते एकत नव्हते, सुमित मडावी याने त्याच्या हातातील चाकु फिरविल्याने माझे कपाळावर लागला व रक्त निघाले , व ते दोघे तेथुन निघुन गेले, म्हणुन त्याचेवर कार्यवाही होणेकरीता मी जबानी रिपोर्ट दिला आहे. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल. |

## ➢ शासकीय कामात अडथडा :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. नांदगावपेठ अप.क्र. ५२६/२३ कलम ३५३,५०४, ५०६,३४ भादवि १३४ MV Act | रहाटगाव गि रेड वर अमरावती | घ.ता.वेळ<br>२७-१२-२३ चे ०७-००वा<br>२७-१२-२३ चे१२-२२ | अजय रान अदार सिंह चव्हाण वय ५३ वर्ष राअर्जुन नगर अमरावती | मो ईकबाल मो जमील वय ४० वर्ष रा जनिल कॉलनी अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फि हे घ.ता.वेळी व टिकाणाहुन जात असताना दि २७-१२-२३ चे ०७-०० वा अवैध्य खनिज वाहतुक करणारा ट्रक क्र एम एच २७ बि एक्स २२२२ यास थांबविले असता च्या ऑलाईन महाखनिज अँप वुन रायलिटि तपासणी केली असता ७ ब्रास रेमी ची ईटीपी क्र १४६०८३३७ ची मुदत दि २६-१२-२३ वेळ ०८-४१ पर्यन्त वैध होता तो वैध मुदत वेळ संपल्यामुळे पंचनामा लीखीत स्वरुपाचा लिहिन्यास सुरुवात केली असता आरोपी याने फोन करुन त्याचे सहकारी याना बोलावले त्यानी म्हटले कि तुमची आयडी दाखवा व फि याना धरुन बाजुला नेले धक्काभुक्की केली व बाजुला ढकलुन दिले मोबाईल हिसकावुन फेकुन दिला शिविगाळ केली शासकिय कामात अळथडा निर्माण केला वरुन फि याचे लेखी रिपोर्ट वरुन गुन्हा दाखल. |

## ➢ वाहन चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता ठ | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे.गाडगे नगर अमरावती अप.क्र. १४८५/२३ कलम ३७९ भा.द.वि. | रॉयल बार अमरावती | दि. २५.१२.२०२३ चे १०.०० वा ते १९.००वा<br>दाखल दि. २७.१२.२०२३ चे १४.२४ वा | श्रीकांत वासुदेव काळपांडे वय ४२ वर्ष.रा. खोरेज कॉलनी आशियाड चौक अमरावती | अज्ञात इसम | हकीकतअशा प्रकारे आहे की, फि. व फि.चा भाऊ हे घरी असलेली टी.व्ही एस कंपनीचा मो.सा. क्र.एम.एच २७- बी.ए-२०१७ सवळीनुसार वापरत असतो. यातील नमुद घ.ता.वेळी फि.चा भाऊ विरेन्द्र काळबांडे हा धारणीयेथे नोकरीवर जाण्याकरीता नमुद वाहन रॉयल बार मधील कर्मचारी व गार्ड गाड्या पार्क करतात तेथे पार्कमध्येठेवुन बसने धारणी येथे निघुन गेले परत दि. २५.१२.२३ रोजी रात्री ७.००वा. घरी परत आला असता फि.ने त्यास वाहन बाबत विचारणा केली सता त्याने सांगितले की,नमुद मोटर सायकल पार्क केलेल्या व इतरत्र ठिकाणी तसेच तेथील गार्डला मोटरसायकल बाबत विचारपुस केली असता सदर मोटर सायकल मिळुन आली नाही. मो.सा.वर्णनटी.व्ही एस कंपनीचा मो.सा. क्र.एम.एच २७- बी.ए-२०१७ किं.अं. ३०,०००/- रु.ची जिचा चेसिस नं. MD६२६WG४xDIN६०३८१ , OG४NT१०५९५०३ असा असुन कुणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. अशा फि.च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पो.स्टे.गाडगे नगर अमरावती अप.क्र. १४८/२३ कलम ३७९ भा.द.वि. | पंचवटी चौक अमरावती | दि. २५.१२.२०२३ चे ११.१५ वा ते ११.२९ वा<br><br>दाखल दि. २७.१२.२०२३ चे १४.३२ वा | बालकराम मोतीराम बेठे वय४९ वर्ष .रा. मु.पबो. नांदुरी ता.धारणी जि. अमरावती ह.मु. पावर हाऊस कॉलनी ,वेलकम पाईट अम. | अज्ञात इसम | हकीकतअशा प्रकारे आहे की,यातील नमुद घ.ता.वेळी व ठीकाणी फि.हे त्याचे जवळ असलेली काळ्या रंगाची निळा पट्टा असलेली जुनी वापरती स्प्लेंडर पल्स दुचाकी वाहन क्र. एम.एच २७-ए.एच-४०१९ ज्याचा चेसीस नं. MBLHA१०EE९HD४३८१५ व इंजिन क्र. HA१०EAHD३२५२२ किं.अम. २०,०००/- रु. ही धेवुन पंचवटी चौक अम.येथे पुलाखाली उभी लॉंक करुन स्काय झेरॉक्स येथे झेरॉक्स काढुन दहा मिनिटांनी परत दुचाकी ठेवलेल्या ठिकाणी आलो असता सदर दुचाकी स्पेलंडर ही दिसुन आली नाही तिचा आजुबाजुला विचारणा केली असता काहीही माहीती मिळाली नाही. असा असुन कुणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. अशा फि.च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |
| ३ | पोस्टे राजापेठ अप क्र १०४४/२०२३ कलम ३७९ भादवी | चिमोटे लेआउट, अमरावती | दि २६/१२/२०२३ चे १६/०० वा ते १९/०० वा.<br><br>दाखल ता वेळ दि २७/१२/२३ चे ००/२१ वा | रोहीत केशव चव्हाण वय- २४ रा. मु. भोकृष्ण.ता. धामनगाव,जि. यवतमाळ अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की,घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे अन्नपुर्णा फायनन्स कंपनी चिमोटे लेआउट अम. येथे काम करतात दि. २६/१२/२३ रोजी १६/०० वा. गाडी पार्कीग मध्ये ठेवुन परत १९/०० वा. गाडी ठेवलेल्या ठीकाणी आले असता गाडी दिसुन आली नाही,आजुबाजुला शोध घेतला मिळुन आली नाही, कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली ,अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल. |

➢ प्रणांकीत अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे सिटी कोतवाली अम शहर अप क्र ५९५/२०२३ कलम २७९, ३०४(अ) भा.द.वी, | प्लँटफॉर्म नं. ६ जवळ बस डेपो अमरावती येथे | घ ता वेळ- दि २७/१२/२० २३ चे ०७.३०वा दरम्यान<br><br>दा ता वेळ - दि २७/१२/२० २३ चे १०.५८. वा. | प्रभाकर उत्तमराव धामनकर वय ४९ वर्ष धंदा - मजुरी, रा. कोल्हा ता. अचलपुर जि. अमरावती ह.मु. जिल्हा परिषद कॉलनी प्रशांत नगर | देवानंद गुलाबराव पारधी वय ३२ वर्ष रा. मु,पो. किन्ही ता. जि. यवतमाळ | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी पो.स्टे. ला येवुन जबानी रिपोर्ट देते कि आज दि. २७.१२.२०२३ रोजी सकाळी ०७.०० वा. चे सुमारास माझे वडील उत्तमराव लक्ष्मणराव धामनकर व आई असे माझे घरुन गावी कोल्हा (काकडा) येथे जाण्यासाठी बस डेपो येथे गेलो होते. काही वेळाने माझे मामेभाउ सचिन मेहरे यांनी मला फोन करुन माहीती दिली कि, त्यांचे मोबाईलवर वरुन फोन आला व त्याने सांगीतले कि, माझे वडील उत्तमराव धामनकर यांचा बस डेपो अमरावती येथे प्लँटफॉर्म नं. ६ येथे अपघात झाला आहे. तरी तुम्ही लवकर पोहचा असे म्हटले असता मी लगेच बस डेपो येथे आलो असता माझे वडीलांना इलाजाकरिता इर्विन दवाखाना अमरावती येथे नेल्याचे समजले म्हणुन मी लगेच इर्विन दवाखाना अमरावती येथे गेलो असता वार्ड नं. ३० मध्ये माझे वडील उत्तमराव धामनकर हे रक्ताने माखलेले दिसले त्यांचे डोके चपकलेले दिसले व त्यांचे दोन्ही पायाला दुखापत झालेली दिसली मला तेथील डॉ. सा. यांनी माझे वडील उत्तमराव धामनकर यांचा अपघात झाल्याने त्यांचा मृत्यु झाल्याचे सांगीतले माझे वडीलांचे प्रेत शवविच्छेदन करिता राखुन ठेवले आहे. तेथे माझे मामे भाउ सचिन मेहरे यांनी सांगीतले कि, ७-३० वा. चे सुमारास बस डेपो अमरावती येथील प्लँटफॉर्म नं. ६ जवळ एस टी बस क्र. MH २७ N८४७९ चे बस चालक हा त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन माझे वडील उत्तमराव धामनकर हे बस चे मागचे चाकाखाली आल्याने त्यांना डोक्याला व हाता पायाला गंभिर दुखापत होवुन त्यांचा जागीच मृत्यु झाला आहे. असे सांगीतले म्हणुन मी सदर बस चालकाचे विरुद्ध पो.स्टे.सिटी कोतवाली येथे तक्रार देण्याकरिता आलो असता तेथे सदर बस चा चालक हा हजर होता. त्याचे नाव विचारले असता त्याने पोलीसासमोर त्याचे नाम देवानंद गुलाबराव पारधी वय ३२ वर्ष रा. मु,पो. किन्ही ता. जि. यवतमाळ असे सांगीतले त्यानेच त्याचे ताब्यातील वाहन भारधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन माझे वडील उत्तमराव लक्ष्मणराव धामनकर यांचे मरणास कारणीभुत झाला आहे. करिता त्याचे विरुद्ध तक्रार देत आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे सिटी कोतवाली अम शहर अप क्र ५९४/२०२३ कलम १४२ म.पो.का. | खापर्डे बगीछा डॉ. सतीश देशमुख यांच्या हॉस्पीटल जवळ अमरावती | घ ता वेळ- दि २६/१२/२०२३ चे २२.४५ वा दरम्यान<br>दा ता वेळ - दि २७/१२/२०२३ चे ००.१२ वा | ना.पो.कॉ. आशिष ब.नं. ३२८ पो.स्टे. सिटी कोतवाली अम. शहर म | विनोद अशोक तायडे वय ३५ वर्ष रा. समाधान नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पो.स्टे. हद्दीत पो स्टाफ सह पेट्रोलिंग करिता असता गुप्त बातमीदाराकडुन माहीती मीळाली कि, पो.स्टे. हद्दीतुन तडीपार असलेला इसम नामे विनोद अशोक तायडे वय ३५ वर्ष रा. समाधान नगर अमरावती हा नमुद घटनास्थळी फिरत आहे वरुन फिर्यादी हे पंटनाम्यातील पंचाना सोबत घेवुन सरकारी वाहनाणे नमुद घ. ता. वेळी गेले असता नमुद आरोपी हा फिरतांना मिळुन आला त्यास त्याचे नाव गाव वितारवे असता त्याने त्याचे नाव विनोद अशोक तायडे वय ३५ वर्ष रा. समाधान नगर अमरावती असे सांगीतले सदर तडीपार इसम हा तडीपार आदेश क्र. पोउपआ/परि-२ तडीपार/१२३८/२०२३ दि. ०४.१०/२०२३ नुसार १ वर्षा करिता अमरावती शहर व अम. ग्रामिण येथुन तडीपार करण्यात आला आहे. त्यास पो.स्टे. हद्दीत फिरण्याचे कारणा विचारले असता उडवाउजवीचे उत्तरे दीली . नमुद तडीपार इसम यांने कोणाचीही पुर्व परवानगी न घेता अम. आयुक्तालय व ग्रामिण हद्दीत मिळुन आल्याने सदरचा गुन्हा दाखल. |
| २ | पोलीस स्टेशन नागपुरीगेट अमरावती अप क्र ६२२/२३ कलम ५(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५, सह कलम ११(१) क प्राण्यांचे छळ प्रतिबंध कायदा | अन्सार नगर बाडी अमरावती | दि. २६/१२/२०२३ चे २२/१५ वा<br>दाखल दि. २७/१२/२३ चे ०२/५४ ला | पोनि विवेकानंद राऊत पो.स्टे नागपुरगेट अमरावती | घर क्र ए.एम.सी /ई७-६३३ चा अज्ञात घरमालक | हकीकत अशा प्रकारे आहे की आम्ही दुय्यम पोनी विवेकानंद राऊत पो.स्टे नागपुरीगेट अमरावती आमची आज दि. १२/१२/२०२३ चे २१/०० वा चे ०५/००वा संपुरण आयुक्तालयात सरनाईट ड्युटी असतांना २२/१५ वा गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, अन्सार नगर बाडी अमरावती येथे एका अज्ञात गोठ्यात गोवंश जनावरे कत्तली करिता डांबुन ठेवले आहे.अशा खात्रीलायक माहीती वरुन आम्ही घटनास्थळातील नमुद पंचाना अन्सार नगर बाडी येथे बोलावुन त्यांना वरील प्रमाने माहीती समजावुन सांगुन सदर कार्यवाही करिता पंच म्हणुन हजर राहनेस कळविले असता त्यांना संमती दर्शवली वरुन आम्ही पो.स्टाफ पोहे का ७९,१२९६, १३०७,नापोका १४८२ पोका ६७७ व पंच असे मिळालेल्या माहीती वर गेलो असता तेथे असलेल्या गोठ्या जवळ गेलो असता आम्हाला पक्के सिर्मेट विटाने व छतवर टिन असलेले घर क्र ए.एम.सी /ई७- ६३३ मध्ये पाहणी केली असता काही गोवंश जनावरे निर्दतेने बांधुन ठेवल्याचे दिसले पंचा समक्ष सदर गोवंश ची पाहनी केली असता १५ गोवंश जनावरे गाय ६. गोरे ७, कारोड १ बैल १ असे एकुण १५ गोवंश किं . अं. १,८२,००० रु चे गोवंश जनावरे यांना निर्दतेने पाय तोंड बांधुन कोडुन कत्तली करिता आणल्याचे पंचा समक्ष पंचनाम्या प्रमाने जप्त करुन ताब्यात घेतले व १५ गोवेश यांना संरक्षण व सवर्धना करिता म.न.पा. यांचे वाहन क्र एम.एच.३१ -५१०६ या वाहणा मध्ये गौरक्षण संस्था दस्तुर नगर अमरावती येथे दाखल करने करिता पोहेका ७९ नापोका १४८१ यांचे हस्ते पत्र देवुन रवाना करण्यात आले अज्ञात मालक यांचे हे कृत्य कलम ५(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५, सह कलम ११(१) क प्राण्यांचे छळ प्रतिबंध कायदा प्रमाने होत असल्याने नमुद घर क्र ए.एम.सी /ई७- ६३३ चा अज्ञात घरमालक विरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे अशा फिर्यादीचे लेखी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | **रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल.** |

## ➢ अकस्मात मृत्यु :-

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **पो.स्टे.गाडगेनगर अम. --मर्ग क्र. ८८/२०२३ कलम १७४ जा.फौ. -** | **राजपुत ढाबा मागे दिलीप बाजड याचे शेतात** | **महेन्द्र उर्फ आशिष अढाळगे वय २५ वर्ष.रा. वलगाव अमरावती** | **उमेश मारोतराव वानखडे** | **गळफास घेवुन आत्महत्या** | **आम्ही म.पोहे.का. अनिता ब.न.१३२४ पो.स्टे.गाडगेनगर येथे दि. २.१२.२०२३ चे २१.०० वा ते ०८.००वा. स्टे.डा डयुटी चालु असताना उमेश मारोतराव वानखडे वय ३९ वर्ष. रा. वलगाव यांनी पो.स्टे.लायेवुन जबानी रिपोर्ट दिला की त्याचा चुलत भाऊ महेन्द्र उर्फ आशिष अढाळगे वय २५ वर्ष.रा.वलगाव अम.याने राजपुत ढाबा जवळ दिलीप बाजड याचे शेतात गळफास घेतला सदरचा जबानी रि.वरुन घटनास्थळी जावुन व डॉं.सा याचे तपसणी त मृत घोषिक केले वरुन सदरचा मर्ग दाखल.** |
| २ | पोस्टे नागपुरी गेट मर्ग क्र २५/२०२३ कलम १७४ जाफौ | मन्नत पॅलेस जवळ लालखडी अमरावती | निसार अहेमद खान वय ७६ वर्ष रा यास्मीन नगर नवाब कॉलेज जवळ अमरावती | पोहेका अरुण कोल्हे ब न ४९१४ मेडीकल पोलीस बुथ अजनी नागपुर | अपघात झाल्याने उपचार दरम्यान मृत्यु | आम्ही पोहेका शिवनाथ आंधळे ब न ४९४ ची आज दि २७/१२/२०२३ रोजी ०९/०० ते १४/०० वा पावेतो तपास मदत ड्युटी असता बारनिशी महिला अमलदार भारती ब न ७२९ यांनी पोस्टे अजनी नागपुर येथे मृतक निसार अहेमद खान वय ७६ वर्ष रा यास्मीन नगर नवाब कॉलेज जवळ अमरावती हा मन्नत पॅलेस जवळ अपघात झाल्याने मेडीकल कॉलेज अजनी नागपुर येथे इलाजा करित असतांना दि १०/१२/२०२३ रोजी मरण पावला त्या बाबत पोस्टे अजनी येथे मर्ग क्र ००/२३ कलम १७४ जाफौ चा दाखल झाला ती डायरी पोस्टेला प्राप्त झाली वरून सदर कागदपत्रावरून पोस्टेला मर्ग दाखल |

